REVIEW OF RESEARCH

IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# '' डॉ. पंजाबराव देशमुखांचे शैक्षणिक कार्य ''

प्रा.डॉ.शरद आर. डवरे

तायवाडे महाविद्यालय कोराडी जि.नागपूर.

## प्रस्तावना :–




डॉ. पंजाबराव देशमुख हे सहकार, कृषी शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात ज्ञान व योगदान असणारे गतिशील असे व्यक्तीमत्व होय. त्यांचा जन्म 27 डिसेंबर 1898 रोजी अमरावती जिल्हयातील नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील पापळ या खेडेगावात एका शेतकरी कुटूंबात झाला. त्यांच्या पित्याचे नाव शामराव तर आईचे नाव राधाबाई होते. इ.स. 1998 मध्ये इयत्ता 10 वी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि आपले महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथे विशेष प्राविन्य संपादन करूण पुर्ण केले. इ.स. 1920 मध्ये ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. तेथे त्यांनी एम.ए. ऑनर्स संस्कृत ही अत्यंत मानाची पदवी संपादन केली. इ.स. 1925 मध्ये त्यांनी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतून बार ॲट लॉ आणि डी.फील हया पदव्या संपादन केल्या. 'वैदिक साहित्यातील धर्माचा उगम व विकास' हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. डॉ. पंजाबराव देशमुख हे श्री शिवाजी शैक्षणिक संस्था अमरावतीचे संस्थापक अध्यक्ष होते. इ.स. 1931 मध्ये या संस्थेची स्थापना झाल्यापासून डॉ. पंजाबरावांनी आपल्या जीवणाच्या अखेरच्या क्षणापर्यंत 1965 पर्यंत या संस्थेच्या कार्याची धुरा सांभाळली आणि अधिकाअधिक शिक्षणप्रसार केला.

## विषय विवेचन :–

भारतीय तत्वज्ञानामध्ये जसे डॉ. पंजाबराव देशमुखांचे योगदान आहे तसे शिक्षणक्षेत्रातही त्यांचे योगदान महत्वपुर्ण आहे. संसदेतील त्यांच्या भाषणातून आणि चर्चासत्र किंवा कार्यशाळांमधून त्यांनी जे विचार मांडले यातून त्यांना शिक्षणाविषयी असलेली तळमळ त्यांची विशाल दृष्टी आणि व्यक्ती व समाजविकासासाठीचे साधन असलेल्या शिक्षणाबद्दलचे विचार लक्षात येतात. जानेवारी 1958 मध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सिल्व्हर ज्युबली समारंभाचे वेळी विदर्भ शैक्षणिक अधिवेशन भरविण्यात आले होते. त्यावेळी आपल्या प्रास्ताविक भाषणात डॉ. पंजाबराव देशमुख यांनी प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकीकरण व सक्तीचे शिक्षण यावर भर दिला. 1928 ते 1930 या काळात डॉ. पंजाबराव देशमुख अमरावती जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष होते. त्यांच्या प्रेरणेने व कार्यामुळे संपुर्ण जिल्हयात ग्रामीण भागात प्राथमिक शाळा सुरू झाल्या. डॉ. पंजाबरावांच्या मते, शैक्षणिक सस्थांमध्ये वाढ झाली तर अधिकाधिक लोकांना शिक्षण देता येईल आणि शिक्षण प्रसारातून वाईट रूढी, पंरपरा किंवा अनिष्ठ बांबींचे निर्मूलन करता येईल. शिक्षण घेत असतांना कोणताही भेदभाव केला जाणार नाही, कोणत्याही जाती–धर्माच्या, वंशाच्या किंवा वर्गाच्या बालकांना जर एकसाथ, एकत्रीत शिक्षण दिले तर जातीभेदाच्या भिती उन्मळून पडतील आणि खऱ्या अर्थाने एकात्मता प्रस्थापित होईल. सामाजिक समता व सामाजिक न्याय शिक्षणातून प्रस्थापित व्हावा यावर ते भर देत असत. वर्षानुवर्ष शिक्षणापासून वंचीत राहिलेल्या समाजाला इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी त्यांना शिक्षणाच्या सोयींची संधी उपलब्ध करूण देणे म्हणजे खऱ्या अर्थाने सामाजिक समता प्रस्थापित होईल. 11 ऑगस्ट 1948 रोजी भारतीय घटनेच्या मसुदा समितीच्या बैठकीत डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले, ''सर्व काही गुणवत्तेच्या आधारे व्हावे, कोणालाही मदतीची गरज नाही. अशा केवळ घोषणा देऊन किंवा वल्गना करून उपयोग नाही, तर जे अपंग आहेत, आर्थिक दृष्टया कमकुवत आहेत ते शिक्षणाचा खर्च पेलू शकत नाही. अशांचा विचार केल्याशिवाय समानता व सामाजिक न्याय प्रस्थापित होऊ शकणार नाही. म्हणूनच अशा बालकांच्या शिक्षणासाठी मदत देणे हे सरकारचे कर्तव्य आहे.'' डॉ. पंजाबराव देशमुख हे भारती शेतकऱ्याची दैन्यावस्था जाणून होते आणि म्हणूनच या वर्गाच्या पाल्यांना शिक्षणाच्या सवलती आणि नोकरीमध्ये काही सवलती द्याव्यात. शिक्षणाच्या संधी त्यांना उपलब्ध करून द्याव्यात, असे त्यांनी आग्रही मत प्रतिपादन केले. 5 जून 1958 रोजी मालेगाव नाशिक येथे भरलेल्या राष्ट्रीय स्तरावरच्या शैक्षणिक अधिवेशनात अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले, आपल्याला अगदी शिक्षण नसल्यापेक्षा केवळ लिहिता

वाचता येणारे शिक्षणही चालेल आणि जर शहरातील लोक शिक्षणाचे कार्य करून थकले असतील किंवा आता शिक्षण पुरे झाले, असे ज्यांना वाटत असेल तर अशांनी शहरी शाळा आणि महाविद्यालये बंद करुन मला ग्रामिण भागात शाळा सुरू करण्यासाठी परवानगी द्यावी, यात मला फार आंनद वाटेल. यावरून शिक्षण खरोखरच तळागळापर्यंत पोहचावे, समाजातील प्रत्येकाला ते घेता यावे अशा उदात्त ध्येयानेच डॉ. पंजाबरावांनी शिक्षणामध्ये योगदान दीले.

लोकसभेत 8 एप्रील 1948 रोजी सैनीकी सक्तीचे करावे या संदर्भात बील पास झाले तेव्हा देशातील प्रत्येक युवकाला प्रशिक्षण सक्तीचे करावे कारण त्यामुळे शिस्त, संघटन क्षमता आणि देशासांठी त्याग करण्याची वृत्ती युवकांमध्ये विकसीत होईल. लोकशाही राष्ट्रामध्ये लोकशाही टिकविण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता साध्य करण्यासाठी या गुणांची आवश्यकता असल्याचे डॉ. पंजाबराव देशमुखांचे प्रांजळ मत होते.

महात्मा फुलेंप्रमाणेच डॉ.पंजाबराव देशमुखांनी शिक्षणाची गुणवत्ता टिकून ठेवण्यासाठी स्त्री– शिक्षणाचा पुरस्कार केला. त्यांनी सादर केलेल्या 'लोक विद्यापीठ' या योजनेखाली विविध अभ्यासक्रमही सुचविले. नर्सिंगहोम, शिशु आणि कूटुंब आरोग्य केंद्र अशा काही वैशिष्टपूर्ण वाहिण्या या लोकविद्यापीठाअंतर्गत चालविल्या जात होत्या. मुलींच्या वस्तीगृहाला सोयी–सुविधा पुरवण्यावरही डॉ.पंजाबराव देशमुखानीं भर दिला. खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षित झाली तरच कुटूंबाचा विकास होईल हे जाणून डॉ. पंजाबरावानीं स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली. अपूरा निधी, सतत बदलणारे प्रशासन आणि भवि यातील विकास कार्यक्रम अशा विविध कारणांचा पाठपुरावा करण्यासाठी आणि आपले कार्य उत्कृष्टरितीने करण्यासाठी काही शिक्षणसंस्था असमर्थ ठरलेल्या होत्या. अशा कमकुवत किंवा डबघाईस आलेल्या संख्याचे आपल्या शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये डॉ.पंजाबरावांनी विलीनीकरण करूण समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहचविण्याचे कार्य केले.

## निष्कर्ष :–

डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे बराच काळ जिल्हा कौन्सील बोर्डाचे अध्यक्ष आणि नागपूर विद्यापीठाचे सभासद होते. त्या काळात त्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात दैदिप्यमान अशी प्रगती केली. त्यांचे मोठेपण केवळ त्यांच्या धार्मीक आणि तात्वीक कार्यामुळच नव्हे तर त्यांच्या शिक्षणाविषयीच्या व्याव्हारिक दृष्टीकोनातून प्रतित होतो. अतिशय कठीन परिस्थितीतून त्यांनी स्वतःचे शिक्षण पुर्ण केले आणि तितक्याच तळमळिने समाजातील सर्व घटकांना शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. विशेषतः शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून विदर्भातल्या मागास भागात केलेल्या शैक्षणिक कार्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य हिमालयासारखे उत्तुंग बनले. डॉ. पंजाबरावांच्या शैक्षणिक कार्याला मानाचा मुजरा.

## संदर्भ ग्रंथ :–

1) कोलारकर डॉ. श. गो – आधुनिक विदर्भाच्या इतिहास, मंगेश प्रकाशन नागपूर, 2005
2) पंडित, बन्सी आणि इतर– उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर 2006.
3) करंदिकर, डॉ. सुरेश आणि इतर – उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन कोल्हापूर, 2010.
4) सावरकर सुदाम/सुर्यकर, रा. ब. – भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख–जीवन व कार्य, अमरावती 1964.
5) नागपूरे ना.पा. आणि इतर – डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख विविध गुणदर्शन, अमरावती 1965.
6) रिढे, नितीन – लोकनेते डॉ. पंजाबराव देशमुख, अमरावती 2010.
7) वक्काणी डॉ. नि. आ. – आधूनिक विदर्भाच्या इतिहास मंगेश प्रकाशन नागपूर,2003.